IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 1, February 2024

# नाशिक जिल्ह्यातील वाणिज्य विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या युवकांच्या उद्योजकीय गुणांचे अध्ययन

प्रा. डॉ. उदय खंडू टेके
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
म. स. गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प

**प्रास्ताविक**

तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होत नसल्यामुळे व्यवसाय सुरु केला जातो, परंतु व्यवसाय यशासाठी 'व्यवसाय संधी' व 'व्यावसायिकता' हे दोन महत्त्वाचे घटक असतात.संधी असेल तर व्यवसाय सुरू करता येईल; पण व्यावसायिकता नसेल तर मात्र व्यवसायात यश मिळणार नाही,व्यवसायाचे अस्तित्व कायमस्वरूपी राहणार नाही.अनेक तरुण,ज्यांच्या कुटुंबात, अगोदर कुणीही व्यवसाय केलेला नाही, त्यांच्याकडे व्यवसायाची पार्श्वभूमी नाही, वारसाहक्काने येणारे सल्ले व माहिती नाही असे तरुण नोकरीच्या अभावी उद्योग सुरु करत आहेत/करणार आहेत त्यामुळे ते प्रथम पिढीच्या उद्योजक ठरणार आहेत.

तरुणांच्यामध्ये 'उद्योजकीय व्यावसायिकता' येण्यासाठी अंगभूत गुणांची तसेच काही गुण अंगी बानविण्याची गरज आहे. उद्योजकीय कार्याचे यश हे उद्योजकाकडे असणाऱ्या गुणांचा परिणाम असते असे म्हणणे अयोग्य ठरणार नाही.ही उद्योजकीय कौशल्ये अथवा गुणांच्या बाबतीत नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुणांची स्थिती काय आहे हे अभ्यासले आहे. यासाठी नाशिक जिल्ह्यातील वाणिज्य विद्याशाखेत पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी अभ्यासले आहेत.

यशस्वी उद्योजक बनण्यासाठी व्यक्तीमध्ये काही ठराविक उद्योजकीय वैशिष्टे (Entrepreneural Traits) असणे अत्यावश्यक आहे.काही मानसशास्त्रीय (Psychological) आणि वागणूक विषयक (Behavirioul) चाचण्यांचा उपयोग करून कोणत्या व्यक्तीमध्ये उद्योजकीय वैशिष्टे आहेत हे ठरविता येते.अशा व्यक्तींची काळजीपूर्वक निवड करून त्यांना एका पूर्वनियोजित व व्यवस्थितपणे संघटीत करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आल्यास,व्यावसायिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातूनही पहिल्या पिढीचे यशस्वी उद्योजक निर्माण होऊ शकतात हे सिद्ध झाले आहे.[१]

**व्यक्तीचे गुण** म्हणजे त्या व्यक्तीचे असे वैशिष्ट्यपूर्ण घटक की जे त्याला इतर व्यक्तींपासून स्वतःची वेगळी ओळख करून देतात.व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाची अशी वैशिष्टे जी व्यक्तीला मी कोण आहे याचे उत्तर देतात.कोणत्याही व्यक्तीकडे एकापेक्षा अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटक दिसून येतात त्यामुळे व्यक्ती अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटकांचा समुच्चय असतो असे म्हटले जाते.व्यक्तीचे एखाद्या क्षेत्रातील यश/निष्पत्ती हे त्यांच्या असणाऱ्या गुणांच्या वापरावर अवलंबून असते.[२] त्यामुळे उद्योजकाला औद्योगिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपले वैशिष्ट्यपूर्ण घटक पूर्ण क्षमतेने वापरावे लागतात त्याला उद्योजकांचे गुण म्हणता येईल.

एका यशस्वी उद्योजकाकडे कोणते गुण असतात/असावे यावर सर्व अभ्यासकांचे एकमत असणे केवळ अशक्य आहे कारण ही वैशिष्ट्ये प्रत्येक उद्योजकाच्या बाबतीत वेगवेगळी असतात तसेच काही वैशिष्ट्ये प्रत्येक उद्योजकाच्या बाबतीत समान असतात.

**संदर्भ**

**[1].** डॉ.अरुण येवले, डॉ.छाया सुखदाणे,डॉ.अरविंद चौधरी - व्यावसायिक उद्योजकता- 2019 -प्रशांत पब्लिकेशन, जळगाव पान नं.८३.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 1, February 2024

**[2].** K.Sasi Kumar and Mr.Jacob Thomas - Human Resource Management Practices in Kerala State Co-operative Bank Ltd.-2000,Publication-Management Researcher Page No.41

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

DOI: 10.48175/IJARSCT-15317